अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०९ चा शपथेवर जबाब
माझे नांव — कैलास हरिपंडीत मोहिते,
माझे वय – ६५ वर्ष, धंदा : सेवानिवृत्त.
राहणार – जालना, ता. जि. जालना.

**सरतपासणी सहाय्यक सरकारी वकील श्री. एस. बी. साबळे यांच्यामार्फत सूरू**

०१. दि.२६.११.२०१७ रोजी मी कदीम जालना पोलीस ठाणे येथे पोलीस उप निरीक्षक म्हणुन कार्यरत होतो. ठाणे अंमलदार यांनी मला असे सांगितले की, प्रस्तुत गुन्हयातील फिर्यादी हा जखमी असल्याने त्यांनी त्यास दवाखान्यात उपचाराकरीता पाठविले आहे. त्यानंतर मी सरकारी दवाखान्यात गेलो असता फिर्यादी तेथे भरती होते. फिर्यादीची स्थीती संदर्भात डॉक्टरांना पत्र दिले. डॉक्टरांनी फिर्यादी हा जबाब देण्याच्या परिस्थीतीत आहे असे सांगितल्याने मी फिर्यादीचा जबाब घेतला. सदर जबाबावरुन मी गुन्हयाची नोंद केली. नि.क्र.४० वरील जबाब मला दाखविला असता तो तोच आहे. त्यावर माझी, फिर्यादीची व डॉक्टरांची सही आहे.

०२. प्रस्तुत गुन्हयाचा तपास माझ्याकडे होता. तपासादरम्यान मी घटनास्थळी जाऊन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला असता तो तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.७८** देण्यात येत आहे. मी साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले. आरोपींनी गुन्हयात वापरलेल्या तीन वेळुच्या काठया काढुन दिल्याने त्या जप्त केल्या. आता मला तीन जप्ती पंचनामे दाखविले असता ते तेच आहेत. त्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र.७९ ते ८१** देण्यात येते. मुद्देमाल पावती फाडली. आता मला मुद्देमाल पावती दाखविली असता ती तीच आहे. त्यास **नि.क्र.८२** देण्यात येते. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आता मला वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविले असता ते तेच आहे. त्यास नि.क्र.६४ देण्यात आलेली आहे. आरोपींविरुध्द पुरावा मिळुन आल्याने मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपीने

फिर्यादीला काठीने मारहाण करुन जखमी केले. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकेल. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत. जप्त मुद्देमाल दाखविल्यास ओळखु शकेल. आता मला जप्त मुद्देमाल तीन काठया दाखविण्यात आल्या असता त्या त्याच आहेत. त्यास आर्टिकल 'अ' 'ब' व 'क' देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. जी. एम. जक्कलवार यांच्यामार्फत सुरु–</u>**

०३. एम. एल. सी. मी नोंदविली नाही. फिर्यादीचा जबाब नोंदविल्यानंतर मी त्यावर सही केली होती. आता मला फिर्यादीचा जबाब नि.क्र.४० दाखविला असता त्यावर जबाब माझ्या समक्ष नोंदविला म्हणुन माझी सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीचा एम. एल. सी. जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४० वरील जबाब फिर्यादीने माझ्यासमक्ष दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२६.११.२०१७ रोजी फिर्यादीने माझ्यासमक्ष जबाब दिला नाही. साक्षीदार रमेश याने जबाब देताना असे सांगितले नव्हते की, त्यांच्या चारही भावात वाद सुरु आहेत, माझ्या मोठया व लहान भावाला वाटणी दिली, मी वाटणी मागितली असता मला वाटणी दिली नाही. त्याने असेही सांगितले नव्हते की, मारहाणीत त्याच्या डाव्या अंगठयाला मार लागुन फ्रॅक्चर झाला होता. साक्षीदार क्र.५ व ६ यांनी त्यांच्या सरतपासात सांगितलेली घटना जबाब देताना सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे घर व टाऊन हॉल यामध्ये बरेच अंतर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ व जप्ती पंचनामे केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरुध्द पुरावा नसताना खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–
(सि. म. पाडोळीकर)
मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.

दि. ०२.१२.२०२५.